छोटी जाहीरातसाठी संपर्क

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

आपल्या दैनिकात छोटी जाहीरात प्रकाशित करण्यासाठी hinduprakashvarta@gmail.com या मेल वर आपली जाहीरात पाठवावे, तसेच खालील नंबरवर संपर्क साधावा.

जाहीरात व्यवस्थापक
दैनिक हिंदू प्रकाश वार्ता, संभाजीनगर
Mob. No.: 7261999911

दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

वेअर हाऊस, गोडाऊन भाड्याने देणे/घेणे साठी

Chaitali enterprises.leading warehouse leasing company Chhatrapati Sambhaji nagar

संपर्क

www.chaitali enterprises.com वर किंवा मोबाईल नंबर 9226611011 वर साधावा.

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०४ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ४५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## नाशिक TCS धर्मांतर प्रकरणातील आरोपपत्रात जलील यांचे नाव

**नाशिक :** नाशिकच्या बहुचर्चित TCS धर्मांतर प्रकरणात दाखल झालेल्या पहिल्या आरोपपत्रात 'एमआयएम'चे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या नावाचा थेट उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे 'टीसीएस' च्या नाशिक कार्यालयातील लैंगिक छळ आणि सक्तीच्या धर्मांतर प्रकरणाला आता एक नवं वळण मिळालं आहे.

**३,५०० पानांचे पहिले आरोपपत्र दाखल :** नाशिक पोलिसांनी TCS प्रकरणात दाखल एकूण ९ गुन्ह्यांपैकी पहिल्या गुन्ह्यात सुमारे ३,५०० पानांचे पहिले आरोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या या पहिल्या गुन्ह्यात बलात्कार, धार्मिक भावना दुखावणे आणि अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. आरोपपत्रातील माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खानचा अटकपूर्व जामीन नाशिक न्यायालयाने फेटाळल्यानंतर ती फरार झाली होती. यावेळेस एमआयएमचे माजी नगरसेवक मतीन पटेल यांनी निदा खानला पोलिसांपासून लपवण्यासाठी आश्रय दिल्याचे समोर आले होते.

**"इम्तियाज जलील यांना विचारावं लागेल" :** निदा शोधासाठी निघालेल्या गुन्हे शाखेने मतीन पटेल यांना छत्रपती संभाजीनगर येथे चौकशीसाठी बोलावले आणि निदा खान कुठे आहे, असे विचारले; त्यावेळेस पटेल यांनी वारंवार एकच उत्तर दिले. ते म्हणजे "इम्तियाज जलील यांना विचारावं लागेल". कसून चौकशी केल्यानंतर अखेर मतीन पटेल यांनी पोलिसांना छत्रपती संभाजीनगरमधील नारेगाव-कौसर सिडको भागातील त्या जागेचा पत्ता दिला, जिथे निदा आणि तिचे कुटुंबीय लपले होते. याठिकाणी पोलिसांनी तात्काळ छापा टाकून निदा खान, तिचे आई-वडील, भाऊ आणि मावशी यांना ताब्यात घेतले.

**पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभे राहणार :** दरम्यान, इम्तियाज जलील यांनी निदा खानच्या कुटुंबीयांची भेट घेतल्याचं नाकारलेलं नाही. २१ एप्रिल रोजी त्यांनी जाहीरपणे सांगितले होते की, आपण पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभे राहणार आहोत. तसेच प्रशासनाने केलेल्या घरतोडीच्या कारवाईविरोधात त्यांनी आंदोलनाचे नेतृत्वही केले होते. एका सभेत बोलताना जलील म्हणाले होते, "आम्ही हा लढा कायदेशीररित्या लढू. पक्ष मतीन यांना त्याच जागी यापेक्षा मोठे आणि चांगले घर बांधून देईल."

**इम्तियाज जलील यांची प्रतिक्रिया समोर :** या संपूर्ण प्रकरणावर सध्या सौदी अरेबियात हज यात्रेसाठी गेलेले इम्तियाज जलील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "माझे नाव आरोपपत्रात आल्याची मला कल्पना नाही. पण मी कोणत्याही प्रकारच्या चौकशीला सामोरे जाण्यास पूर्णपणे तयार आहे. मी आधीच मान्य केले आहे की मी त्या मुलीच्या (निदाच्या) कुटुंबाला भेटलो होतो आणि जे मला योग्य वाटते, त्यासाठी माझा लढा सुरूच राहील." दुसरीकडे, मतीन पटेल यांचे वकील अभयसिंह भोसले यांनी सांगितले की, "जलील हे पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष असल्याने पटेल यांनी त्यांचे नाव घेतले असावे. यात कोणताही कट नाही, याला केवळ राजकीय रंग दिला जात आहे."

## थोडक्यात वार्ता

### 5 हजारांची लाच मागितली; आरटीओ कर्मचाऱ्याला पकडल

**मुंबई :** मुंबईतील बोरिवली प्रादेशिक परिवहन कार्यालयातील एका कर्मचाऱ्याला लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) अटक (Arrest) केली आहे. दंडाची रक्कम कमी करून देण्याच्या मोबदल्यात लाच मागितल्याचा आरोप संबंधित कर्मचाऱ्यावर आहे. या कारवाईमुळे परिवहन विभागात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या खासगी बसवर वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्याप्रकरणी २६,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. दंडाची रक्कम कमी करण्यासाठी तक्रारदाराने बोरिवली येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधला होता. कनिष्ठ लिपिक मिथुन विलास आडे असं लाच घेतलेल्या लिपिकाचे नाव आहे. यावेळी कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने दंड कमी करून देण्यासाठी ५,००० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने प्राथमिक पडताळणी केली. चौकशीत संबंधित कर्मचाऱ्याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सापळा रचण्यात आला. यावेळी आरोपीने ५ हजार रुपयांपैकी ४ हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवली होती. सोमवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कारवाई करत संबंधित कर्मचाऱ्याला ४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

### दिल्लीतील अग्नितांडवात एकाच कुटुंबातील 8 जणांचा दुर्दैवी अंत

**नवी दिल्ली :** दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील फ्लोरिश स्टे बी अँड बी हॉटेलमध्ये बुधवारी सकाळी लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील आठ जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण राजधानी हादरली आहे. नातेवाईकांच्या उपचारासाठी रुग्णालयात आलेल्या कुटुंबावर काळाने असा घाला घातला की, काही क्षणांत संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले. महावीर एन्क्लेव्हमध्ये राहणारे प्रेम बन्सल यांची मुलगी, जावई आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य या दुर्घटनेचे बळी ठरले. प्रेम बन्सल यांचे जावई विवेक अग्रवाल हे गुरुग्रामच्या सेक्टर ४६ येथे राहत होते. व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट असलेल्या विवेक अग्रवाल यांच्या वडिलांची प्रकृती बिघडल्याने त्यांना दिल्लीतील मॅक्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वडिलांची विचारपूस करण्यासाठी आलेल्या नातेवाईकांना घेऊन विवेक अग्रवाल बुधवारी सकाळी साडेआठच्या सुमारास जवळील हॉटेलमध्ये नाश्त्यासाठी गेले होते.

### नसरापूर प्रकरणी न्यायालयात तीन लहान मुलांची साक्ष

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि खून प्रकरणाच्या खटल्यात एक मोठी घडामोडी समोर आली आहे. घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या तीन लहान मुलांनी अत्यंत निर्भीडपणे न्यायालयासमोर आपली साक्ष नोंदवली. आरोपी भीमराव कांबळे यानेच पीडित मुलीला पत्र्याच्या शेडमध्ये नेल्याचे आणि त्यांना पाहून दगड मारल्याचा संपूर्ण घटनाक्रम या प्रत्यक्षदर्शी मुलांनी न्यायालयाला सांगितला.पुण्याच्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्यासमोर या खटल्याची सुनावणी सुरू आहे. मंगळवारी (२ जून) या तीनही प्रत्यक्षदर्शी मुलांची साक्ष न्यायालयात नोंदविण्यात आली.

## टीसीएसनंतर विप्रोमध्येही कॉर्पोरेट जिहाद

**पुणे :** नाशिक येथील 'टीसीएस' आणि मुंबईतील 'एसबीआय' बँकिंग क्षेत्रातील वादग्रस्त प्रकरणांनंतर आता पुण्याच्या हिंजवडी येथील 'विप्रो टेक्नॉलॉजीज लिमिटेड' या नामांकित आयटी कंपनीत धार्मिक छळ आणि कॉर्पोरेट स्तरावर जाणीवपूर्वक अन्याय झाल्याचे गंभीर प्रकरण उघडकीस आले आहे. धर्मांतरास आणि अनैतिक मागण्यांना नकार दिल्याने एका २० वर्षीय हिंदू महिला कर्मचाऱ्याला बळजबरीने नोकरीवरून काढून टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली असून, पीडितेने 'श्रमिक पत्रकार भवन' येथे पत्रकार परिषद घेऊन या अन्यायाला वाचा फोडली.

पीडित महिलेने दिलेल्या माहितीनुसार, ती विप्रो कंपनीत प्रामाणिकपणे कार्यरत असताना तिच्याच टीममधील शाहिना रफिक नावाच्या महिला सहकाऱ्याने तिच्या वैयक्तिक आयुष्यात अवाजवी हस्तक्षेप सुरू केला. शाहिनाने पीडितेला मूळ हिंदू धर्म सोडून इस्लाम स्वीकारण्याचा आणि तिच्या ओळखीच्या एका मुस्लिम व्यक्तीशी शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा सातत्याने आग्रह धरला. यासाठी तिला दुबईत ऐषोआरामात जगण्याची प्रलोभनेही दाखवण्यात आली. या त्रासाला कंटाळून जेव्हा पीडितेने या कृत्यास ठाम नकार दिला आणि कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रीतसर तक्रार केली, तेव्हा कंपनी प्रशासनाने आरोपीवर कारवाई करण्याऐवजी उलटपक्षी सूडबुद्धीने पीडितेवरच एकतर्फी कारवाई केली.अन्यायाचा कळस ऑगस्ट २०२५ च्या अखेरीस गाठला गेला, जेव्हा एचआर प्रतिनिधी प्रशांत जी.आर. याने पीडितेला एका 'मायक्रोसॉफ्ट टीम्स' मीटिंगसाठी बोलावले. आरोपानुसार, या मीटिंगदरम्यान तांत्रिक क्लृप्त्या वापरून पीडितेच्या लॅपटॉपचा स्क्रीन कंट्रोल स्वतःकडे घेण्यात आला आणि तिच्या संमतीविना बळजबरीने सिस्टीमवरून तिचा राजीनामा सादर करण्यास भाग पाडले गेले. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना आणि भारतीय श्रम कायद्यांना हरताळ फासून केलेली ही कारवाई पूर्णपणे अवैध असल्याचे पीडितेच्या वकिलांनी सांगितले.



### उच्चस्तरीय तपासाची मागणी

**पत्रकार परिषदेत उपस्थित 'हिंदु जनजागृती समिती'चे संघटक सुनील घनवट यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला. "बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उच्च पदांवर बसून हिंदू महिलांच्या धार्मिक स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा हा प्रकार अत्यंत चिंताजनक आहे," असे ते म्हणाले. या प्रकरणी समिती मुख्यमंत्र्यांकडे उच्चस्तरीय तपासाची मागणी करणार असून, आयटी क्षेत्रातील अशा प्रकारचा कोणताही अजेंडा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.**

५० लाखांच्या भरपाईसह कायदेशीर नोटीस

या संस्थात्मक अन्यायाविरुद्ध पीडितेने वकिलामार्फत विप्रो प्रशासनाला कायदेशीर नोटीस धाडली आहे. दबावाखाली घेतलेला राजीनामा रद्द करून सेवासातत्यासह पुन्हा सन्मानाने नोकरीवर रुजू करावे, अशी मुख्य मागणी यात करण्यात आली आहे. याशिवाय, अतोनात मानसिक त्रासापोटी ५० लाख रुपयांची आर्थिक नुकसान भरपाई द्यावी आणि मुख्य संशयित शाहिनासह तिला पाठीशी घालणारे वरिष्ठ अधिकारी वसीम आणि झीशान अहमद यांच्यावर कडक कारवाई करावी, असे नोटिसीत म्हटले आहे. १५ दिवसांत योग्य पावले न उचलल्यास न्यायालयात थेट खटला दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## सोन्याच्या दरात घसरण; भाव 1 लाखांच्या खाली येणार? तज्ज्ञांनी व्यक्त केला अंदाज

**मुंबई :** गेल्या काही आठवड्यांपासून सोन्याच्या (Gold Rate) दरांमध्ये मोठी चढ-उतार पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी विक्रमी पातळी गाठल्यानंतर आता सोन्याच्या किमतींमध्ये हळूहळू घसरण होताना दिसत आहे. त्यामुळे आगामी काळात सोन्याचा भाव 1 लाख रुपयांच्या खाली येणार का, याबाबत ग्राहक आणि गुंतवणूकदारांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, आंतरराष्ट्रीय बाजारातील बदलांचा सोन्याच्या दरावर थेट परिणाम होत आहे. अमेरिकन डॉलर मजबूत होणे, व्याजदरांतील बदल, विविध देशांच्या केंद्रीय बँकांची आर्थिक धोरणे आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील घडामोडी यामुळे सोन्याच्या किमतींवर दबाव निर्माण झाला आहे.

याशिवाय, जागतिक शेअर बाजारात वाढ होत असल्याने अनेक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीऐवजी इतर पर्यायांकडे वळत आहेत. परिणामी, सोन्याची मागणी काही प्रमाणात कमी झाली असून त्याचा परिणाम दरांवर दिसून येत आहे. देशातील विविध शहरांमध्ये २४ कॅरेट सोन्याच्या किमतींमध्ये अलीकडच्या काळात घट झाली आहे. शहरानुसार कर आणि इतर शुल्कांमुळे दरात थोडाफार फरक असला तरी ग्राहकांना पूर्वीच्या तुलनेत काहीसा दिलासा मिळाला आहे. बाजार



तज्ज्ञांच्या मते, जागतिक परिस्थिती अनुकूल राहिल्यास आणि डॉलरच्या तुलनेत रुपया स्थिर राहिल्यास सोन्याच्या दरात आणखी घसरण होण्याची शक्यता आहे. मात्र भाव १ लाख रुपयांच्या खाली जातील की नाही, हे आगामी आर्थिक घडामोडींवर अवलंबून असेल. दीर्घकालीन गुंतवणूक करणाऱ्यांसाठी सध्याचा काळ अनुकूल मानला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, एकरकमी गुंतवणूक करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने सोने खरेदी केल्यास बाजारातील चढ-उताराचा धोका कमी होऊ शकतो. त्यामुळे सध्याच्या घसरणीचा फायदा घेण्याचा सल्ला जाणकारांकडून दिला जात आहे.

## पतीने केला पत्नीचा कुऱ्हाडीने खून

पैठण दि ३० :- पैठण शहरांमध्ये काल रात्री अल्पवयीन मुलाचा खून झाल्याची घटना ताजी असतानाच बुधवारी दि.३ रोजी सकाळी आठ वाजता संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरात झाड झुडपे असलेल्या पाण्याच्या वड्याच्या ठिकाणी पतीने पत्नीवर कुऱ्हाडीने वार करून खून केल्याची गंभीर घटना घडली आहे. पत्नीला कायमचं संपवून आरोपी पती स्वत पोलीस ठाण्यात हजर झाला असून मृत्यू झालेल्या महिलेचे नाव मंदाबाई सुरेश अंगारखे वय ४५ रा. गांगलवाडी ,नारळा पैठण असे आहे.

अधिक माहिती अशीही पैठण शहरातील गांगलवाडी नारळा भागात राहणाऱ्या सुरेश अंगारखे याने बुधवारी रोजी सकाळी आठ वाजता नेहमीप्रमाणे संत ज्ञानेश्वर उद्यानातील झाड झुडपे असलेल्या पाण्याच्या वड्याजवळ लाकडाचे सरपण तोडण्यासाठी हे पती-पत्नी सोबत गेले होते. यावेळी पती सुरेश अंगारखे याने मंदाबाईवर सोबत आणलेल्या कुऱ्हाडीने जोरदार तीन वार करून कायमचं संपविले. पत्नी रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडल्याचं लक्षात येताच आरोपी सुरेश अंगारखे स्वत पोलीस ठाण्यात हजर होऊन पोलिसांना "मी बायकोला कायमचं संपविले" असे सांगितले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग,ऋषिकेश तळेकर, पो.कॉ शुभम पाटील, कल्याण ढाकणे सह पोलीस पथकाने घटनास्थळ पडताळणी करुन पाहणी पंचनामा केला. महिलेचा मृतदेह पैठण येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. यावेळी पोलीस पथकाने ज्या कुऱ्हाडीने पत्नीचा खून केला सदरील कुऱ्हाड जप्त केली. पतीने पत्नीचा खून कोणत्या कारणाने केला या संदर्भात पैठण पोलीस पुढील तपास करीत आहे.

## संशयित गायीचे तूप जप्त; एफडीएची प्रसन्ना डेअरी अँड फूड्सवर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३ जून :** मा. अन्न सुरक्षा आयुक्त श्री. तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार अन्न व औषध प्रशासन (FDA), छत्रपती संभाजीनगर यांनी संशयित अन्नपदार्थांविरोधात कारवाई करत गजानन नगर येथील मे. प्रसन्ना डेअरी अँड फूड्स या आस्थापनातून सैल (लूज) गायीचे तूप जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या अन्नपदार्थाची किंमत १८ हजार १५० रुपये इतकी आहे.

या प्रकरणात श्री. प्रमोद नाथा निमसे (वय ३६) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. संशयित अन्नपदार्थ असल्याच्या कारणावरून सैल गायीच्या तुपाचा साठा जप्त करण्यात आला असून पुढील तपासासाठी नमुने घेण्यात आले आहेत.



ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी श्री. एस. टी. जाधवर, अन्न सुरक्षा अधिकारी कु. कीर्तिका झाडे तसेच श्री. योगेश चिभडे यांनी संयुक्तपणे केली.

सदर कारवाई मा. श्री. डी. व्ही. पाटील, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, छत्रपती संभाजीनगर तसेच मा. श्री. एस. आर. करकळे, सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थांचा वापर करण्याचे आवाहन केले असून भेसळयुक्त अथवा संशयित अन्नपदार्थांची माहिती प्रशासनास देण्याचे आवाहन केले आहे.

## पेवर ब्लॉकच्या बिलासाठी 40 हजारांची मागणी; ग्रामपंचायत अधिकारी अडकला

कन्नड : दि.०३ जून - तालुक्यातील मक्रणपूर व रेल ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी विजय जोंधळे यांना ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहात पकडल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. या कारवाईमुळे ग्रामपंचायत वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार, ग्रामपंचायत हद्दीत पूर्ण झालेल्या पेवर ब्लॉक कामाचे प्रलंबित बिल मंजूर करून देण्यासाठी संबंधितांकडे विजय जोंधळे यांनी पैशांची मागणी केल्याचा आरोप आहे. याबाबत संबंधित व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारीची शहानिशा केल्यानंतर एसीबीच्या पथकाने नियोजनबद्ध सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारत असताना विजय जोंधळे यांना पथकाने ताब्यात घेतले. कारवाईनंतर अधिकाऱ्यांकडून आवश्यक पंचनामा व इतर प्रक्रिया पार पाडण्यात आल्या. या प्रकरणामुळे कन्नड तालुक्यातील ग्रामपंचायत प्रशासनाच्या कामकाजाबाबत विविध चर्चांना उधाण आले असून, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. ही कारवाई पोलीस निरीक्षक शांतीलाल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात पोलीस हवालदार रविंद्र काळे, विलास चव्हाण, चांगदेव बागुल,

## 30 स्टॉलच्या वाटपाचा अजूनही सुटेना पेच; गरिबाच्या रोजगाराला रोज लागतेय नवी ठेच!

हिंदू प्रकाशवार्ता । नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** संत रोहिदास महामंडळाकडून अत्यंत आशेने ही कल्याणकारी योजना समाज कल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आली खरी, मात्र छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात केवळ शासकीय अनास्थेमुळे पात्र लाभार्थी अजूनही हक्काच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. विशेष आणि धक्कादायक बाब म्हणजे, वर्ष २०२१ पासून ते सद्यस्थितीत या योजनेचे तब्बल ३९४ पात्र अर्ज प्रशासकीय लालफितीच्या कारभारात आणि धूळ खात पडले आहेत. हे गरजू अर्जदार गेल्या ५ ते ६ वर्षांपासून पत्राचे स्टॉल मिळून हाताला रोजगार मिळेल या आशेने समाज कल्याण कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. मात्र, प्रशासकीय पातळीवरील प्रचंड वेळकाढूपणामुळे आणि अनास्थेमुळे या गरीब कामगारांच्या पदरी अद्याप केवळ आश्वासने आणि रखडपट्टीच आली आहे.

योजनेच्या मूळ नियमांनुसार, प्रत्येक पात्र लाभार्थ्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी ४७ हजार रुपये किमतीचा पत्र्याचा मजबूत स्टॉल (टपरी) आणि इतर आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी डीबीटी द्वारे थेट बँक खात्यात ५ हजार रुपयांचे आर्थिक अनुदान देण्याची कायदेशीर तरतूद आहे. या कल्याणकारी कामासाठी विभागाला दोन टप्प्यांत मिळून १६ लाख रुपयांचा निधी अखेर प्राप्त झाला खरा, पण खरी मेख आणि नियोजनाचा पत्ता नसलेला घोळ लाभार्थ्यांच्या निवडीवरूनच सुरू झाला आहे. गेल्या ५ वर्षांपासून शेकडो अर्ज पेंडिंग असताना, उपलब्ध तुटपुंज्या निधीतून केवळ ३० लाभार्थ्यांची निवड कशी करायची आणि त्यासाठी काय नवीन निकष लावायचा, यावरूनच आता प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये अंतर्गत पातळीवर मोठा पेच निर्माण झाला आहे. वास्तव पाहता, 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या साध्या, सरळ आणि पारदर्शक नियमाचा विचार करून २०२०-२१ मधील ६६ पात्र लाभार्थ्यांना आधी न्याय देणे कायदेशीररीत्या गरजेचे होते. परंतु, समाज कल्याण विभागाचे अधिकारी मात्र निकषांचे वेगवेगळे चक्रव्यूह रचून गरिबांना हक्काच्या लाभापासून जाणीवपूर्वक ताटकळत ठेवत असल्याचा आरोप आता होऊ अर्जदार लागला आहे.

प्रशासकीय पातळीवर लाभार्थ्यांच्या निवडीचा हा अजब खल सुरू असतानाच, दुसरीकडे पुरवठादाराची संथ आणि संशयास्पद गतीही चव्हाट्यावर आली आहे. पैठण एमआयडीसी येथील 'अंकित कॉटेजेस' या कंपनीला ३० पत्र्याचे स्टॉल वेळेत तयार करून देण्याचे कंत्राट प्रशासनाने दिले होते. परंतु, त्यांच्याकडून आजतागायत विभागाला केवळ ११ स्टॉल प्राप्त झाले आहेत. उर्वरित स्टॉल कधी मिळणार, कंत्राट वेळेत पूर्ण का झाले नाही, याची कोणतीही अधिकृत स्पष्टता फाईलवर उपलब्ध नाही. कंत्राटदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. मुळात ३९४ कामगार अनुदानासाठी आणि सन्मानाने जगण्याच्या रोजगारासाठी चातकासारखी वाट पाहत असताना, अधिकारी मात्र केवळ ३० स्टॉलच्या वाटपाचा निकष ठरवण्यात आणि कागदी घोडे नाचवण्यातच पूर्णपणे रमले आहेत. त्यामुळे एकीकडे वरिष्ठ यंत्रणा कमालीची सुस्त असून, प्रत्यक्ष जमिनीवर राबणारा आणि उन्हातान्हात कष्ट करणारा गरीब गटई कामगार मात्र पूर्णपणे लाचार, हतबल आणि उघड्यावर पडला आहे.

### अतिरिक्त 2 कोटींच्या निधीची मागणीचा प्रस्ताव

**"आम्हाला ३१ मार्चपर्यंत केवळ १६ लाख रुपयांचा निधी मिळाला असून, हा निधी प्रलंबित अर्जांच्या प्रचंड संख्येच्या तुलनेत अत्यंत तोकडा आहे. सध्या उपलब्ध असलेल्या निधीतून तातडीने ३० पत्र्याचे स्टॉल वाटप करण्याचे नियोजन सुरू आहे. उर्वरित सर्व ३६४ पात्र लाभार्थ्यांसाठी प्रशासनाकडून शासनाकडे आणखी २ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी करणारा सविस्तर प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. शासनाकडून मंजुरी येताच पुढील प्रक्रिया केली जाईल."**

**– सीमा शिंदिकर**
**(निरीक्षक, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर)**

### समाज कल्याणचा कारभार म्हणजे केवळ आश्वासनांचा फुलोरा!

**राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्याच बालेकिल्ल्यात गरीब कामगारांच्या हक्काचा खेळखंडोबा सुरू असून, हक्काच्या रोजगारासाठी गरजू कामगार मात्र कमालीचे त्रस्त झाले आहेत. वर्ष २०२१ पासून ते आजपर्यंत तब्बल ३९४ पात्र अर्जदारांचे अर्ज धूळ खात पडले आहेत. ३१ मार्च रोजी १६ लाखांचा निधी प्राप्त झाला खरा, पण या शेकडो अर्जदारांमधून फक्त ३० पत्र्याचे स्टॉल कसे वाटायचे, या 'निवडीच्या पेचा'ने प्रशासनाचा पुरता पोबारा उडाला आहे.**

### मंत्री महोदयांच्याच जिल्ह्यात कोंडी!

**राज्याचे सामाजिक न्यायमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्रीपद एकाच वजनदार नेत्याकडे म्हणजेच संजय शिरसाट यांच्याकडे आहे. संपूर्ण राज्याचा समाज कल्याण विभाग आणि जिल्ह्याची सर्व मुख्य सूत्रे त्यांच्याच हाती असल्याने, या ३९४ गरीब कामगारांचे रखडलेले प्रश्न आणि ५ वर्षांपासूनची प्रलंबित फाईल तातडीने मार्गी लागणे अपेक्षित होते. ही कोंडी फोडण्यासाठी आणि गरिबांच्या रोजगाराला लागलेली ठेच थांबवण्यासाठी आता थेट पालकमंत्री महोदयांनीच या संपूर्ण प्रकरणात तात्काळ लक्ष घालून प्रशासकीय पेच मिटवावा, तसेच उर्वरित पात्र अर्जदारांसाठी अतिरिक्त निधी मंजूर करावा, अशी आर्त हाक आता जिल्ह्यातील सर्व गरजू कामगारांकडून दिली जात आहे.**

**पालकमंत्री संजय शिरसाट यांच्यासोबत संपर्क केला असता त्यांनी फोन उचलण्याचे टाळलं . त्याच बरोबर त्यांच्या पीएनेही प्रस्तुत प्रतिनिधीचा फोन उचलला नाही.**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## जनारोग्याशी खेळणाऱ्यांना दणका आणि प्रशासकीय धडाका

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर विभागातील यंत्रणा पूर्णपणे सक्रिय झाली असून, जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई सुरू झाली आहे. राज्यातील सात जिल्ह्यांमधील बारा आयुर्वेदिक औषध विक्री आस्थापनांवर धडक कारवाई करत लाखो रुपयांचा संशयास्पद औषध साठा जप्त करण्यात आला आहे. भ्रामक आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती असलेल्या मिसब्रँडेड औषधांवर ही मोहीम राबवण्यात आली असून, संबंधितांविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यापासून अन्न व औषध प्रशासन विभागात नव्या ऊर्जेने काम सुरू झाले असून राज्यभरात आक्षेपार्ह जाहिराती आणि अवैध औषध साठ्यावर नजर ठेवण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. नागपूर विभागातील ही यशस्वी कारवाई ही केवळ एक सुरुवात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. या धडक मोहीमेत एफडीए अधिकाऱ्यांनी नागपूर जिल्ह्यातील येरला येथे एका पॅकिंग युनिटवर छापा टाकला. या कारवाईत पतंजली समूहाशी संबंधित दिव्य फार्मसीने तयार केलेल्या औषधांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या औषधांची एकूण किंमत लाखो रुपयांपेक्षा अधिक आहे. ही कारवाई सहआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली गेली. जप्त करण्यात आलेल्या औषधांमध्ये न्यूरोग्रिट गोल्ड, मेमोरीग्रीट, मधुग्रिट, मेलानोग्रिट, सिस्टोग्रिट आणि नारीकांची यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या औषधांच्या पॅकेजिंग आणि जाहिरातींमध्ये मधुमेह, स्थूलपणा, त्वचारोग तसेच इतर गंभीर आजारांवर पूर्ण उपचार होत असल्याचे भ्रामक दावे करण्यात आले होते. अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या आक्षेपार्ह मजकुरामुळे एफडीएने ही तातडीची आणि मोठी कारवाई केली. जनतेच्या आरोग्याशी संबंधित कोणत्याही प्रकारची फसवणूक सहन केली जाणार नाही, अशी रोखठोक भूमिका प्रशासनाने घेतली आहे. भ्रामक जाहिराती प्रसिद्ध करणे, अवैध उत्पादन आणि विक्री याविरुद्धची कारवाई यापुढे अधिकाधिक कठोर आणि सातत्यपूर्ण राहील, असा सज्जड दमही दिला गेला आहे. या प्रकारच्या गैरप्रकारांमध्ये गुंतलेल्या कोणत्याही

## गुणवत्तेच्या परीक्षेत समाजाची परीक्षा

महाराष्ट्र CET 2025-26 च्या निकालानंतर समाजमाध्यमांवर, विद्यार्थीवर्गात आणि पालकांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. काही विद्यार्थ्यांनी १०० percentile आणि अत्यंत उच्च गुण मिळवले, ही निश्चितच उल्लेखनीय बाब आहे; परंतु काही विद्यार्थ्यांच्या पूर्वीच्या शैक्षणिक कामगिरीच्या तुलनेत हे निकाल पाहून अनेकांच्या मनात आश्चर्य, शंका आणि अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

एखादा विद्यार्थी दहावी आणि बारावीमध्ये सरासरी किंवा त्याहून कमी गुण मिळवत असताना अचानक अत्यंत कठीण स्पर्धा परीक्षेत सर्वोच्च percentile कसा मिळवू शकतो, हा प्रश्न अनेक जण विचारत आहेत. या प्रश्नाचे उत्तर सरळ आणि भावनिक प्रतिक्रिया देऊन मिळणार नाही; त्यासाठी वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशीची गरज आहे. कारण प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याला संशयाच्या कटघऱ्यात उभे करणे जितके चुकीचे आहे, तितकेच संभाव्य गैरव्यवहारांकडे दुर्लक्ष करणेही धोकादायक आहे.

आजची स्पर्धा परीक्षा व्यवस्था ही केवळ विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेची परीक्षा राहिलेली नाही, तर त्यांच्या मानसिक ताकदीची, आर्थिक परिस्थितीची आणि सामाजिक व्यवस्थेवरील विश्वासाचीही परीक्षा बनली आहे. लाखो विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करतात, स्वप्न पाहतात, अपयश सहन करतात आणि पुन्हा उभे राहतात. अशा वेळी जर परीक्षांबाबत सतत पेपर लीक, solver gangs, mass cheat-ing किंवा दलालांचे जाळे यांसारख्या बातम्या समोर येत राहिल्या, तर मेहनती विद्यार्थ्यांच्या मनात नैराश्य निर्माण होणे अपरिहार्य ठरते.

NEET पेपर लीकचे प्रकरण असो, विविध भरती परीक्षांतील गैरव्यवहार असोत किंवा शिक्षण क्षेत्रातील वाढता व्यापारीकरणाचा प्रभाव — या सर्व घटनांनी समाजाच्या मनात एक गंभीर प्रश्न निर्माण केला आहे .

“मेहनत खरोखरच पुरेशी आहे का?”

ही भावना अत्यंत धोकादायक आहे. कारण जेव्हा एखाद्या राष्ट्रातील तरुणांचा merit, प्रामाणिकपणा आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होऊ लागतो, तेव्हा त्या राष्ट्राची बौद्धिक शक्ती आतून कमकुवत होऊ लागते. परीक्षा ही केवळ नोकरी किंवा प्रवेश मिळवण्याची प्रक्रिया नसते; ती समाजाच्या नैतिक आरशाचे प्रतिबिंब असते.

इतिहास साक्षी आहे की कोणतेही राष्ट्र फक्त आर्थिक संपत्तीने महान होत नाही; ते महान होते न्याय, पारदर्शकता आणि समान संधी यांच्या बळावर. जपानने युद्धानंतर शिक्षणातील शिस्तीवर भर देऊन स्वतःला उभे केले. दक्षिण कोरियाने गुणवत्तेला सर्वोच्च मान देऊन तंत्रज्ञानात जागतिक स्थान मिळवले. आणि भारतातही अनेक गरीब, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी केवळ मेहनतीच्या बळावर मोठे यश मिळवून दाखवले आहे. त्यामुळे व्यवस्थेवरील विश्वास जिवंत राहणे अत्यंत आवश्यक आहे.

सरकार, परीक्षा संस्था, शिक्षण मंडळे आणि समाज या सर्वांची जबाबदारी आहे की प्रत्येक परीक्षेची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करावी. पेपर सुरक्षा, डिजिटल मॉनिटरिंग, स्वतंत्र चौकशी यंत्रणा, दोषींवर जलद कारवाई आणि विद्यार्थ्यांशी प्रामाणिक संवाद — या गोष्टी आता पर्याय नाहीत, तर काळाची गरज बनल्या आहेत.

परंतु या संपूर्ण चर्चेत आपण एक गोष्ट विसरता कामा नये — प्रत्येक उच्च गुण मिळवणारा विद्यार्थी दोषी नसतो. काही विद्यार्थी खरोखरच कठोर परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण तयारीमुळे असामान्य यश मिळवतात. म्हणूनच शंका उपस्थित करणे आवश्यक असले, तरी न्याय आणि संवेदनशीलता यांचा समतोल राखणे अधिक आवश्यक आहे.

आज भारताचा युवा फक्त रोजगारासाठी झगडत नाही; तो विश्वासासाठी झगडत आहे. त्याला केवळ नोकरी नको आहे, तर न्याय्य संधी हवी आहे. त्याला केवळ गुण नको आहेत, तर त्या गुणांमागील प्रक्रियेवर विश्वास हवा आहे.

कारण राष्ट्राची खरी ताकद इमारतींमध्ये, घोषणांमध्ये किंवा आकडेवारीत नसते — ती असते त्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील आशेमध्ये, जे अजूनही विश्वास ठेवतात की

“मेहनत व्यर्थ जात नाही.” आणि हा विश्वास टिकवणे, हीच कोणत्याही लोकशाही राष्ट्राची सर्वात मोठी जबाबदारी आहे.

- P. M. Dhumal sir

## बंजारा वस्तीगृहापासून ‘माई वृद्धाश्रम’पर्यंत : संघर्ष, संवेदना आणि समाजसेवेचा दीपस्तंभ – समाजभूषण रामदास वाघमारे यांचा प्रेरणादायी प्रवास

"स्वतःच्या आयुष्यातील दुःख, अभाव आणि संघर्ष यांना समाजसेवेच्या शक्तीत रूपांतरित करणारी माणसेच खऱ्या अर्थाने समाजाचे भूषण ठरतात." हे वाक्य ज्यांच्या जीवनाला तंतोतंत लागू पडते, अशा व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे समाजभूषण रामदास वाघमारे.गरीबी, कष्ट, उपासमार, अपमान आणि संघर्ष यांच्या कठीण वाटेवरून चालत आज अनाथ,निराधार, वंचित आणि बेघर वृद्धांच्या आयुष्यात मायेचा आधार बनलेले रामदास वाघमारे यांचे जीवन हे केवळ यशोगाथा नाही, तर समाजासाठी झटणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी जीवनग्रंथ आहे. जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील साकळगाव या छोट्याशा खेड्यात एका अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. मोलमजुरी करणाऱ्या आईच्या कष्टांवर संसाराचा गाडा चालत होता. पाच भावंडांमधील सर्वात लहान शेंडेफळ असलेल्या रामदास यांच्या बालपणात सुखसोयी नव्हत्या, पण शिक्षणाची जिद्द मात्र प्रखर होती.






साकळगावच्या जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी कंधार एज्युकेशन सोसायटीच्या श्री शिवाजी हायस्कूल, खोकडपुरा आणि कर्मवीर शंकरसिंग मामा नाईक याच्या बंजारा वस्तीगृहात राहून माध्यमिक शिक्षण घेतले. त्या काळात परिस्थिती इतकी बिकट होती की सहावीपासूनच स्वतःच्या शिक्षणाचा खर्च स्वतःच उचलण्याची वेळ त्यांच्यावर आली.

शाळा सुटल्यानंतर दुपारी हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करणे, स्वतःचे कपडे, पुस्तके, शिक्षणाचा खर्च भागविणे आणि त्याच वेळी अभ्यासात सातत्य राखणे, हे त्यांच्या आयुष्याचे दैनंदिन वास्तव होते. अनेक वेळा पोटाची भूक दाबून त्यांनी शिक्षणाची भूक जिवंत ठेवली.

देवगिरी महाविद्यालयातून अकरावी-बारावी पूर्ण केल्यानंतर त्यांनी विवेकानंद महाविद्यालयातून बी.ए. आणि एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. या प्रवासात त्यांच्या आयुष्यात मीरा वाघमारे यांचे आगमन झाले. लग्नानंतर संसाराला खऱ्या अर्थाने स्थैर्य लाभले. एक आदर्श पत्नी, सहचारिणी आणि समाजसेविका म्हणून मीराताईंनी प्रत्येक संघर्षात खंबीरपणे साथ दिली. ऋत्विक (जीवन) आणि गौरव या दोन मुलांच्या जन्माने संसार फुलला, पण संघर्षाची वाट मात्र थांबली नाही.

जीवनाला निर्णायक वळण मिळाले ते त्यांच्या चित्रकलेचे गुरु सुभाष पाटील सर यांच्या भेटीतून. सर्वोदय कला मंडळ संचलित छत्रपती प्राथमिक विद्यालय येथे त्यांनी आपल्या शाळेत अध्यापनाची संधी दिली. १३ जून १९९७ रोजी केवळ २०० रुपये मासिक वेतनावर त्यांनी शिक्षक म्हणून काम सुरू केले.

विद्यार्थ्यांना शिकविणे हा त्यांच्यासाठी केवळ रोजगार नव्हता; ती त्यांची साधना होती. मुलांच्या भवितव्यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले. नंतर वेतन ५०० रुपये आणि पुढे १५०० रुपये झाले, पण त्यावेळीही आर्थिक अडचणी कायम होत्या. शाळेला अनेक वर्षे अनुदान मिळाले नाही. तब्बल बारा वर्षे त्यांनी अत्यल्प मानधनावर अथवा जवळपास विनामूल्य सेवा दिली. २०१० मध्ये शाळेला २० टक्के अनुदान मिळाले आणि त्यांच्या सेवेला काही प्रमाणात आर्थिक आधार मिळाला.परंतु या काळातही उदरनिर्वाहासाठी शाळेनंतर हॉटेलमध्ये काम करण्याची वेळ त्यांच्यावर येत होती. एकीकडे शिक्षकाची जबाबदारी आणि दुसरीकडे श्रमिकाचे आयुष्य दोन्ही भूमिका त्यांनी प्रामाणिकपणे निभावल्या.

रामदास वाघमारे यांच्या यशामागे मीराताई वाघमारे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी डी.एड. पूर्ण करून शिक्षक म्हणून कार्य सुरू केले. संसाराची जबाबदारी सांभाळत त्यांनी समाजसेवेची धुरा देखील उचलली.

अनेकदा समाजकार्य करणाऱ्या व्यक्तीचे नाव प्रकाशझोतात येते; पण त्यामागे त्याग, समर्पण आणि संयमाने उभे असणारे कुटुंब फार कमी लोकांना दिसते. मीराताई हे त्या अदृश्य शक्तीचे मूर्तिमंत उदाहरण आहेत.समाजातील वंचित मुलांचे शिक्षण हेच खरे राष्ट्रनिर्माण आहे, या विचारातून सप्टेंबर २०१५ मध्ये बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन या संस्थेची स्थापना झाली.या संस्थेच्या माध्यमातून वीटभट्टीवरील कामगारांची मुले, ऊसतोड कामगारांची मुले, पालावर राहणाऱ्या भटक्या-विमुक्त समाजातील मुले, अनाथ आणि निराधार बालके यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य सुरू झाले.

आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश, प्रवेश प्रक्रिया, मार्गदर्शन आणि आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. दरवर्षी मोफत शैक्षणिक किट वाटप, गरजू विद्यार्थ्यांना मदत आणि समाजातील वंचित घटकांना आधार देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

२०२० हे वर्ष जगासाठी संकटाचे होते. पण याच काळात एका महान सेवाकार्याचा जन्म झाला ‘माई वृद्धाश्रम’ समाजात अनेक वृद्ध असे आहेत ज्यांना ना मुलांचा आधार, ना निवारा, ना दोन वेळचे अन्न काहींना कुटुंबाने नाकारले, तर काहींना परिस्थितीने बेघर केले.अशा वृद्धांसाठी रामदास वाघमारे आणि मीराताई वाघमारे यांनी मायेचा आश्रय उभा करण्याचा संकल्प केला.आनंदनगर-शिवाजीनगर परिसरात स्वतः कर्ज काढून चार मजली भव्य इमारत उभारण्यात आली. ही इमारत केवळ सिमेंट-विटांची नाही; ती करुणा, माया, मानवता आणि संवेदनांनी उभारलेली आहे.आज या वृद्धाश्रमात २५ हून अधिक निराधार माईंची पूर्णपणे मोफत सेवा केली जाते. त्यांच्या निवास, भोजन,

औषधोपचार, आरोग्य तपासणी आणि मानसिक आधाराची व्यवस्था केली जाते. आठ कर्मचारी या सेवेत कार्यरत आहेत.या संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी मीराताई वाघमारे अत्यंत प्रेमाने सांभाळत आहेत. वृद्धाश्रमातील प्रत्येक माई त्यांना मुलगी, बहीण किंवा आईप्रमाणेच जवळची वाटते.

बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनच्या माध्यमातून आज अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. अनाथ व वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे मोफत शैक्षणिक साहित्य वाटप,भोजनदान उपक्रम,महिलांसाठी मासिक पाळी स्वच्छता जनजागृती सॅनिटरी नॅपकिन किटचे मोफत वितरण,वृक्षारोपण मोहीम,योग व ध्यान केंद्र जीवनगौरव सार्वजनिक वाचनालय,मोफत आरोग्य शिबिरे,

रक्तदान शिबिरे,व्यसनमुक्ती अभियान,समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान हे सर्व उपक्रम कोणत्याही शासकीय अनुदानाशिवाय चालविले जातात.

समाजातील दानशूर व्यक्तींचे सहकार्य आणि स्वतःच्या वैयक्तिक उत्पन्नातून ही सेवा अखंड सुरू आहे.

समाजसेवेतील या उल्लेखनीय कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली आणि रामदास वाघमारे व मीराताई वाघमारे या दाम्पत्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यामंत्र्यांच्या हस्ते प्राप्त झालेला हा पुरस्कार त्यांच्या वैयक्तिक यशाचा नाही; तो हजारो वंचित विद्यार्थी, निराधार वृद्ध, गरजू कुटुंबे आणि समाजसेवेला वाहिलेल्या जीवनमूल्यांचा गौरव आहे.

आजच्या भौतिकवादी युगात अनेकजण स्वतःच्या कुटुंबापुरतेच आयुष्य मर्यादित ठेवतात. परंतु रामदास वाघमारे यांनी स्वतःच्या संघर्षाला समाजासाठी जगण्याची दिशा दिली.बंजारा वस्तीगृहातील एका गरीब विद्यार्थ्यापासून ते समाजभूषण पुरस्कार प्राप्त समाजसेवकापर्यंतचा त्यांचा प्रवास हा इच्छाशक्ती, परिश्रम, प्रामाणिकपणा आणि समाजनिष्ठा यांचा अद्भुत संगम आहे.त्यांनी सिद्ध करून दाखविले की, परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द असेल तर माणूस स्वतःचे आयुष्य बदलू शकतो आणि त्याचबरोबर शेकडो-हजारो लोकांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करू शकतो.आज "माई वृद्धाश्रम" हा केवळ एक आश्रम नाही; तो मानवतेचे मंदिर आहे. "बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन" ही केवळ संस्था नाही; ती वंचितांच्या आयुष्यात आशेचा किरण आहे. आणि रामदास वाघमारे हे केवळ आदर्श शिक्षक व समाजसेवक नाहीत; ते संघर्षाला समाजहिताच्या शक्तीत रूपांतरित करणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत.त्यांचा जीवनप्रवास प्रत्येक तरुणाला, प्रत्येक शिक्षकाला, प्रत्येक समाजसेवकाला आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाला एकच संदेश देतो "स्वतःसाठी जगणे सोपे असते; परंतु इतरांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी जगणे, हाच खरा जीवनाचा अर्थ असतो."

**प्रा. ऋत्विक वाघमारे,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.7038093430**

## जागतिक पर्यावरण दिन : विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणारी व्यवस्था

5 जून हा ‘जागतिक पर्यावरण दिन’ म्हणून जगभर साजरा केला जातो. पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व जनमानसात रुजविणे, निसर्गाविषयी संवेदनशीलता निर्माण करणे आणि पृथ्वीच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचा संदेश देणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे. मात्र दुर्दैवाने, आज पर्यावरण दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम, सोशल मीडियावरील पोस्ट, झाडे लावण्याचे फोटोसेशन आणि भाषणापुरता मर्यादित राहिलेला दिसतो. प्रत्यक्षात मात्र विकासाच्या नावाखाली जंगलांची कत्तल, नद्यांचे प्रदूषण, डोंगरांची तोड, हवेत वाढणारे विषारी घटक आणि शहरांच्या काँक्रीटीकरणामुळे पृथ्वीचा श्वासच गुदमरू लागला आहे. आज जग एका अभूतपूर्व पर्यावरणीय संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल, पाण्याची टंचाई, वाढते तापमान, असंतुलित पाऊस, चक्रीवादळे, महापुर, दुष्काळ आणि जैवविविधतेचा ऱ्हास ही केवळ वैज्ञानिक अहवालातील शब्दावली राहिलेली नाही, तर ती आता मानवी जीवनाला थेट ग्रासणारी वस्तुस्थिती बनली आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तर परिस्थिती अधिक गंभीर आहे. कारण येथे लोकसंख्या वाढ, अनियंत्रित शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे पर्यावरणीय समतोल धोक्यात आला आहे.

आज शहरांमध्ये रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली हजारो झाडे एका रात्रीत कापली जातात. प्रशासन म्हणते, “विकासासाठी आवश्यक आहे.” पण हा विकास नेमका कुणासाठी आणि कोणाच्या किंमतीवर? झाडे तोडून, नद्या बुजवून आणि डोंगर फोडून उभे राहणारे सिमेंटचे जंगल खरंच प्रगतीचे प्रतीक म्हणता येईल काय? विकासाचा अर्थ जर फक्त मॉल, उड्डाणपूल, टॉवर्स आणि कारखाने एवढाच उरला असेल, तर आपण भविष्यातील पिढ्यांसाठी मृत्यूचा वारसा तयार करत आहोत, हे स्पष्ट आहे. भारतातील अनेक शहरांची हवा आज धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये वाढते वाहनप्रदूषण, औद्योगिक धूर आणि धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. श्वसनाचे आजार, हृदयविकार, त्वचारोग आणि कर्करोगासारख्या रोगांमध्ये वाढ होत आहे. दुसरीकडे प्लास्टिक प्रदूषणाने नद्या, समुद्र आणि जमीन अक्षरशः गुदमरली आहे. प्लास्टिक बंदीचे कायदे फक्त कागदावर दिसतात, प्रत्यक्षात बाजारपेठेत सर्वत्र प्लास्टिकचा सुळसुळाट सुरूच आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत शासनाची भूमिका अनेकदा दुटप्पी दिसते. एका बाजूला वृक्षारोपण मोहिमा राबवल्या जातात, तर दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रकल्पांसाठी हजारो हेक्टर जंगल




जमीन उद्योगपतींना दिली जाते. जंगल हे केवळ लाकूड किंवा जमीन नसून ते पृथ्वीचे फुफ्फुस आहेत, हे शासनाला समजत नाही का? पर्यावरणीय मंजुरी देताना अनेक नियम पायदळी तुडविले जातात. लोकांचा विरोध डावलून प्रकल्प रेटले जातात. पर्यावरण संरक्षणाच्या कायद्यांमध्येही अनेकदा उद्योगस्नेही बदल केले जातात. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, शासन खरोखर पर्यावरण वाचवू इच्छिते की केवळ विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीची विक्री करत आहे? आज नद्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, पंचगंगा, नाग नदी अशा अनेक नद्या औद्योगिक रसायने, सांडपाणी आणि प्लास्टिक कचऱ्यामुळे प्रदूषित झाल्या आहेत. नदी स्वच्छतेच्या नावाखाली हजारो कोटी रुपये खर्च होतात; पण प्रत्यक्षात नद्यांचे प्रदूषण कमी होताना दिसत नाही. कारण भ्रष्टाचार, नियोजनाचा अभाव आणि प्रशासनाची उदासीनता हेच या समस्येचे मूळ आहे.

पर्यावरणाचा प्रश्न हा केवळ झाडांचा किंवा नद्यांचा प्रश्न नाही; तो मानवी अस्तित्वाचा प्रश्न आहे. शेतकरी आज हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका सहन करत आहे. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ तर कधी गारपीट यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अन्नधान्य उत्पादनातील घट आणि वाढती आर्थिक अस्थिरता यामागे पर्यावरणीय असंतुलन हे एक महत्त्वाचे कारण आहे. पण दुर्दैवाने, पर्यावरणीय प्रश्नांना अजूनही दुय्यम महत्त्व दिले जाते. आजची सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे पर्यावरण संवर्धनाला ‘इव्हेंट’ बनवले गेले आहे. जागतिक पर्यावरण दिन आला की सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, राजकीय पक्ष आणि विविध संस्था झाडे लावण्याचे कार्यक्रम घेतात. फोटो काढले जातात, सोशल मीडियावर पोस्ट टाकल्या जातात आणि दुसऱ्या दिवशी ती रोपे वाळून जातात. पर्यावरण संवर्धन ही सातत्याने चालणारी जीवनशैली असायला हवी, ती केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहून चालणार नाही.

पर्यावरण वाचविण्यासाठी केवळ शासनावर टीका करून उपयोग नाही, प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारीही ओळखली पाहिजे. पाणी वाचविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे, झाडांचे संरक्षण करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण पृथ्वी ही केवळ आपली मालमत्ता नाही; ती पुढील पिढ्यांचीही आहे. शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे. मुलांना केवळ पुस्तकातील धडे शिकवून उपयोग नाही; तर त्यांना प्रत्यक्ष निसर्गाशी जोडणे गरजेचे आहे. वृक्षसंवर्धन, जलसंधारण, जैवविविधता आणि कचरा व्यवस्थापन याबाबत सामाजिक जाणीव निर्माण करावी लागेल. पर्यावरण संरक्षण हे केवळ सरकारी विभागाचे काम नसून समाजाच्या प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेतला पाहिजे.

माध्यमांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा मोठ्या उद्योगसमूहांच्या जाहिरातींच्या दबावामुळे पर्यावरणीय प्रश्नांना पुरेसे स्थान दिले जात नाही. वृक्षतोड, नदीप्रदूषण, खाणकामातील भ्रष्टाचार आणि पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन यावर सातत्याने आवाज उठविणे गरजेचे आहे. कारण स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारिताच समाजाला जागृत ठेवू शकते. आज गरज आहे ती पर्यावरणपूरक विकास मॉडेलची. विकास आणि पर्यावरण हे एकमेकांचे शत्रू नाहीत; पण विकासाचा मार्ग निसर्गाशी सुसंवादी असायला हवा. अक्षय ऊर्जा, जलसंधारण, शाश्वत शेती, हरित तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वाहतूक यांना प्राधान्य दिल्यास विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन साधता येऊ शकते. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, पारदर्शक प्रशासन आणि जागरूक नागरिकत्व आवश्यक आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे “आपण पुढील पिढ्यांना नेमकी कोणती पृथ्वी देणार आहोत?” हिरवीगार, स्वच्छ आणि जीवनदायी पृथ्वी की प्रदूषणाने ग्रासलेला, पाण्यासाठी संघर्ष करणारा आणि उष्णतेने होरपळणारा ग्रह? हा निर्णय आजच्या पिढीला घ्यावा लागणार आहे. निसर्गाशी युद्ध करून मानव कधीच जिंकू शकत नाही. कारण शेवटी निसर्ग आपला समतोल स्वतः निर्माण करतो, पण त्याची किंमत मानवजातीला चुकवावी लागते. कोरोना महामारीनेही आपल्याला हेच शिकवले की, निसर्गाचा अतिरेकाने ऱ्हास केल्यास त्याचे परिणाम किती भीषण असू शकतात.

पर्यावरण वाचविणे ही आता केवळ सामाजिक जबाबदारी राहिलेली नाही, तर ती अस्तित्वाची लढाई बनली आहे. त्यामुळे पर्यावरण दिन हा केवळ उत्सव न राहता तो आत्मपरीक्षणाचा दिवस व्हायला हवा. झाडे लावण्यापेक्षा झाडे जगविण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणाऱ्या धोरणांविरोधात समाजाने जागृतपणे आवाज उठवला पाहिजे. अन्यथा भविष्यातील इतिहास आपल्या पिढीची नोंद “स्वतःच्या विकासाच्या हव्यासापायी पृथ्वी उद्ध्वस्त करणारी पिढी” अशी करेल. आपणास व आपल्या परिवारास जागतिक पर्यावरण दिनाच्या हिरव्यागार शुभेच्छा!

चला...फक्त झाडे लावू नका, ती जगवण्याची जबाबदारीही स्वीकारूया...

पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवूया...

प्लास्टिकमुक्त आणि प्रदूषणमुक्त भारत घडवूया...

निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे. भावी पिढ्यांसाठी हिरवीगार, स्वच्छ आणि सुरक्षित पृथ्वी निर्माण करण्याचा संकल्प करूया!

“निसर्ग वाचला तरच मानवजातीचे अस्तित्व टिकेल.”

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : 9923620919**

## स्व. गोपीनाथराव मुंडे यांना भावपूर्ण अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पक्षाच्या विभागीय कार्यालयात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वर्गीय मुंडे यांच्या जनसामान्यांसाठीच्या कार्याचा, संघर्षमय राजकीय प्रवासाचा आणि समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्वक उल्लेख केला.

या प्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, माजी महापौर बापू घडामोडे, दिलीप थोरात, संजय जोशी, सरचिटणीस हर्षवर्धन कराड, ताराचंद गायकवाड, छाया खाजेकर, अशोक जगधने, युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल दांडगे, अमृता पालोदकर, शालिनी बुंदे, संजय बारवाल, निलेश धारकर, मनोज गांगवे, सुनील जगताप, किसन ठुबे, दीपक खोतकर, सागर पाले यांच्यासह पक्षाचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नायलॉन मांजावर बंदी; पोलीस आयुक्तांचे कडक आदेश

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** शहर परिसरात पतंगबाजीसाठी वापरल्या जाणाऱ्या जीवघेण्या नायलॉन आणि चायनीज मांजावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ अन्वये हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले असून, ५ जून २०२६ पासून या आदेशाची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे दाखल सुमोटो याचिकेतील निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. हा मांजा मूळचा औद्योगिक वापरासाठी असला तरी पतंग उडवण्यासाठी त्याचा गैरवापर होत असल्याचे समोर आले आहे. रस्त्यावर पडणाऱ्या या मांजामुळे लहान मुले, वाहन चालक आणि पादचारी अडकून गंभीर जखमी होतात, तसेच पशू-पक्ष्यांच्या जीवालाही मोठा धोका निर्माण होतो. याशिवाय वीज वाहक तारांवर मांजा पडल्यास शॉर्टसर्किट होऊन आग लागण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर शहरात नायलॉन व चायनीज मांजाची निर्मिती, विक्री, वापर, साठा करणे किंवा तो जवळ बाळगणे यावर पूर्णपणे निर्बंध घालण्यात आले आहेत. हे आदेश ५ जून २०२६ च्या मध्यरात्रीपासून ते ३ ऑगस्ट २०२६ च्या रात्रीपर्यंत अमलात राहतील. जर कोणी या आदेशाचे उल्लंघन करताना आढळल्यास, त्या व्यक्ती या दुकानदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम २२३ तसेच पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम ५ अन्वये कडक फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस आयुक्तांनी दिला आहे. नागरिकांच्या माहितीसाठी हा आदेश शहरातील सर्व पोलीस ठाणी, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, महानगरपालिका आणि मुख्य बाजारपेठांमध्ये प्रसिद्ध केला जात आहे.

## लस मोहिमेचे उद्दिष्ट शंभर टक्के गाठा, हलगर्जी करणाऱ्या यंत्रणेचा थेट मार्ग छाटा; जिल्हाधिकारी विनय गौडा यांचा आरोग्य विभागाला कडक इशारा



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थी बालकाला आणि मुलीला आवश्यक असणाऱ्या सर्व प्रतिबंधात्मक लसी वेळेत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र, प्रशासकीय यंत्रणेतील समन्वयाचा अभाव आणि पालकांची अनास्था यामुळे जिल्ह्यातील लसीकरणाचा टक्का घसरत चालल्याचे चित्र समोर आले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय लसीकरण टास्क फोर्स समितीच्या बैठकीत आरोग्य विभागाला फैलावर घेतले. "एचपीव्ही, पोलिओ, गोवर-रुबेला आणि बीसीजी या सर्वच महत्त्वाच्या लसीकरणाचे शंभर टक्के उद्दिष्ट जिल्ह्याने तातडीने पूर्ण केलेच पाहिजे, यात कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही," असे खणखणीत आणि कडक निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

या बैठकीला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर यांच्यासह महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्ज्वला भांबरे आणि शिक्षण विभागाच्या अधिकारी अश्विनी लाठकर उपस्थित होत्या. बैठकीत जिल्ह्यातील लसीकरणाच्या आकडेवारीचा आढावा घेतला असता, मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून वाचवणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या 'एचपीव्ही' (HPV) लसीकरणामध्ये जिल्ह्याची कामगिरी कमालीची निराशाजनक असल्याचे समोर आले. हा आरोग्याचा गंभीर पेच सोडवण्यासाठी आता केवळ कागदी घोडे न नाचवता, आरोग्य आणि शिक्षण विभागाने थेट मैदानात उतरून काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. शाळा-शाळांमध्ये विशेष पालक सभांचे आयोजन करून पालकांच्या मनातील भीती आणि संभ्रम दूर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील वैजापूर, संभाजीनगर, सोयगाव आणि सिल्लोड या चार तालुक्यांमध्ये तर बीसीजी आणि पोलिओ लसीकरणाचे प्रमाण अत्यंत निचांकी आणि चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. या दुर्गम आणि दुर्लक्षित भागात तातडीने विशेष मोहीम राबवून लसीकरणाचा वेग वाढवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याच पार्श्वभूमीवर, 'पोलिओ मुक्त भारत' अभियानांतर्गत येत्या २८ जून २०२६ रोजी संपूर्ण जिल्हाभरात व्यापक पल्स पोलिओ मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेत रेल्वे स्थानके, बस स्थानके, ग्रामीण भाग तसेच स्थलांतरित ऊसतोड कामगार आणि मजुरांच्या वस्त्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. एकही बालक लस घेण्यापासून वंचित राहणार नाही, यासाठी बूथ स्तरावर तसेच घरोघरी जाऊन मोहीम फत्ते करण्याचे नियोजन आखण्यात आले आहे. अंगणवाडी सेविका, आरोग्य दूत, सामाजिक संस्था आणि एनएसएस (NSS) च्या स्वयंसेवकांची फौज यासाठी मैदानात उतरवली जाणार आहे.

पावसाळा तोंडावर आल्याने उद्भवणाऱ्या संभाव्य आजारांचा धोका ओळखून जिल्हाधिकाऱ्यांनी आगाऊ खबरदारी घेण्याचे संकेत दिले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागात दूषित पाण्यामुळे होणारे आजार रोखण्यासाठी ओआरएस (ORS) पावडर, झिंकच्या गोळ्या आणि इतर आवश्यक औषधांचा पुरेसा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये २४ तास उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केवळ सरकारी यंत्रणेवर अवलंबून न राहता पालकांनीही आपल्या पोटच्या गोळ्यांच्या आरोग्यासाठी स्वतःहून पुढे आले पाहिजे. जवळच्या अंगणवाडी किंवा शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन बालकांना सर्व डोस वेळेत द्यावेत, असे कळकळीचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी शेवटी केले आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांच्या या 'बडग्यानंतर' सुस्त यंत्रणा जागी होऊन शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करते का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

चार तालुक्यांमध्ये यंत्रणेचा फुसका बार!

जिल्ह्यातील वैजापूर, संभाजीनगर, सोयगाव आणि सिल्लोड या चार तालुक्यांमध्ये बीसीजी आणि पोलिओ लसीकरणाचे प्रमाण कमालीचे अत्यल्प आहे. पालकांमधील अज्ञान आणि आरोग्य यंत्रणेचा सुस्त कारभार यामुळे या भागात लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या तालुक्यांमध्ये आता विशेष टास्क फोर्स पाठवून, घरोघरी जाऊन युद्धपातळीवर लसीकरण पूर्ण करण्याचा कडक अल्टीमेटम जिल्हाधिकाऱ्यांनी दिला असून निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार ठेवली आहे.

## जनसामान्यांचा आवाज बुलंद करणारे नेतृत्व म्हणजे स्व. गोपीनाथराव मुंडे – भास्कर आबा दानवे

### पुण्यतिथीनिमित्त जालना भाजपातर्फे अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

जालना, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना महानगर भाजपाच्या वतीने मुंडे चौक येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



यावेळी उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, नारायण पवार, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, नगरसेवक अर्जुन गेही, शशिकांत घुगे, विष्णू डोंगरे, राजेश जोशी, अनिरुद्ध पांजगे, कल्याण भदनेकर, जीवन सले, अजित मानधनी, गौरव गोधेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी सामान्य कार्यकर्त्याला पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याची त्यांची तळमळ आणि जनसामान्यांशी असलेली घट्ट नाळ आजही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्यपद्धतीचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून समाजसेवा करण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा.

ते पुढे म्हणाले की, राज्य आणि देशाच्या राजकारणात स्व. मुंडे यांनी सामान्य माणसाचा आवाज बुलंद केला. त्यांच्या संघर्षमय जीवनातून संघटन बांधणी, जनसंपर्क आणि समाजकारणाचे महत्त्वाचे धडे मिळतात. त्यांचे कार्य आणि विचार पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहेत.

## फिट इंडिया सायकलिंग अभियानात सहभागी व्हा : क्रीडा भारतीचे आवाहन

### 7 जूनपासून प्रत्येक रविवारी सायकलिंग उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, :** भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या व स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'फिट इंडिया सायकलिंग अभियानात' नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन क्रीडा भारती, देवगिरी प्रांततर्फे करण्यात आले आहे.

विश्व सायकल दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना नियमित सायकलिंग करण्याचे आणि फिटनेसला जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार रविवार, ७ जूनपासून देशभर 'फिट इंडिया सायकलिंग अभियान' सुरू होत असून प्रत्येक रविवारी सायकल चालवून फिटनेसचा संदेश समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

क्रीडा भारती ही संस्था 'खेळणारा भारत – निरोगी भारत' या ध्येयाने कार्यरत असून खेळ, योग, व्यायाम, सायकलिंग आणि विविध शारीरिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात आरोग्य, शिस्त व राष्ट्रभावना निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. सुदृढ समाजाच्या माध्यमातून सक्षम राष्ट्र उभारणीसाठी संस्था कार्यरत असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

सायकलिंगमुळे हृदयाचे आरोग्य सुधारते, शारीरिक क्षमता वाढते आणि मानसिक तणाव कमी होतो. तसेच मधुमेह, स्थूलता व उच्च रक्तदाब यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित आजारांचा धोका कमी होण्यास मदत होते. याशिवाय सायकलचा वापर वाढल्यास प्रदूषण कमी होऊन पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळते.

या अभियानात युवक-युवती, विद्यार्थी, महिला, क्रीडापटू, सामाजिक संस्था, शासकीय कर्मचारी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी नोंदणीसाठी https://fitindia.gov.in/world-bicycle-day या संकेतस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन क्रीडा भारती, देवगिरी प्रांतचे अध्यक्ष पंकज भारसाखळे यांनी केले आहे.



पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ उत्साहात संपन्न परतूर, दि. २ जून २०२६ : पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूरच्या वतीने आज मंगळवार दिनांक २ जून २०२६ रोजी श्री श्री रविशंकर ध्यान केंद्र, परतूर येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## वेरुळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिर वाहतूक कोंडीतून मोकळा श्वास कधी मिळेल

### वाहन चालकासह पर्यटकांची नाराजी

**खुलताबाद :** वेरूळलेणी ते घृष्णेश्वर मंदिर रस्त्यावर वाहतुकीच्या कोंडीने अपघाताला आमंत्रणच मिळाल्यासारखे वाटत आहे त्यामुळे वाहन चालकासह पर्यटकांमध्ये नाराजी पसरली आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, वेरूळ लेणी आणि बारावी ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिर पाहण्यासाठी पर्यटक व शहरातील नागरिक या रस्त्याने येत जात असल्या कारणाने वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे याकडे कोणत्याही अधिकाऱ्यांचे लक्ष नाही यामुळे चार चाकी वाहन तसेच तीन चाकी वाहने आणि मोटरसायकल हे पार्किंगला गाडी न लावता रोडच्या डाव्या आणि उजव्या बाजूला लावून ठेवतात त्यामुळे दोन्हीकडून येणारी वाहतूकिस अडचण निर्माण होत आहे. हा अरुंद रोड झाल्यामुळे वाहनेपुढे जात नाही त्यामुळे गाड्यांची रांगच रांग लागत आहे. त्यामुळे येथील नागरिकांना वाहन चालकांना व पर्यटकांना अपघात होऊन मृत्यू होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे.



**मी गल्ले बोरगाव ते घृष्णेश्वर मंदिरात दर सोमवारी दर्शनासाठी येत असतो येथे दररोज खूप गर्दी असते आम्हाला गाडी लावून पायी चालण्यास खूप त्रास होतो यासाठी येथे फुटपाथ बांधायला हवे.**
**कान्हा खोसरे**
**( एक भक्त)**



**"वाहनतळ असुनही वाहने रोडच्या दोन्ही कडेला लावतात. सुशिक्षित पर्यटकही अशिक्षित असल्यासारखे वागतात. यांनी शिस्त पाळली पाहिजे.**
**दिनकर शिरसाट**
**( माजी ग्रामपंचायत सदस्य)**

रोडवर टपऱ्याचे अतिक्रमण; टपऱ्यासमोर वाहनतळ

वेरूळ लेणी व घृष्णेश्वर मंदिर पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांना पायी चालण्यास मोठी अडचण होत आहे. कारण फुटपाथ वर टपऱ्याने अतिक्रमण केले असून त्याच्या टपरी समोरच दुचाकी व चार चाकी गाड्या उभे राहतात, तसेच फूटपातवर अतिक्रमण केल्यामुळे रोडवर पाई चालणाऱ्याची ही गर्दी वाढली आहे .गर्दीमुळे रस्ता अजून अरुंद झाला आहे. यामुळे वाहतुकीला मोठी अडचण निर्माण झाली आहे. या अडचणीच्या वाहन कोंडीतून मोकळा श्वास कधी मिळेल .असे वाहन चालकांना व पर्यटकांना वाटत आहे.

## प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिराचे' आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, :** शासन सेवेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी तातडीने आणि कार्यक्षमतेने सोडवण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबीर' आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जून महिन्यातील विभागस्तरीय शिबिराचे 5 तारखेस आयोजन करण्यात आले आहे.

तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली हे शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावरील अडचणी जिल्हाधिकारी कार्यालयातील तर तालुका स्तरावरील अडचणी हया तहसिल कार्यालयातील आणि विभागीय पातळीवरील अडचणी हया विभागीय आयुक्त कार्यालयातील शिबीरात स्विकारण्यात येणार आहे. अर्जदार अधिकारी / कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी यांना शिबीरास उपस्थित राहून कर्मचा-यांच्या समस्या मांडण्याचेआवाहन करण्यात आले आहे.

अनेकदा कर्मचाऱ्यांना वेतन, पदोन्नती, रजा, निवृत्तीवेतन किंवा सेवापुस्तिका अद्यावत करणे यांसारख्या वैयक्तिक कामांसाठी प्रशासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागतात. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी विभाग, जिल्हा आणि तालुका पातळीवर या शिबिरांचे आयोजन करण्याचे आदेश दिले आहेत. जर पहिल्या शुक्रवारी सुट्टी असेल, तर त्यापुर्वीच्या कामकाजाच्या दिवशी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यालयामध्ये कर्मचारी यांची सेवाविषयक प्रलंबित प्रकरणांची यादी अद्यावत करून तीचा त्या त्या शिबिरात समावेश करण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण होऊन प्रशासकीय कामात गती येईल. सर्व संबंधित विभाग प्रमुखांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले असून, कामात दिरंगाई करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाणार असल्याचे अपर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

## राज्यात 50 किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी न होण्यासाठी नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणार



मुंबई : आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यात माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी करून घेण्यास प्रतिबंध करण्याबाबत लवकरच स्वतंत्र परिपत्रक जारी करण्यात येणार आहे. यासंदर्भातील नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी दिले.

माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा जास्त वजनाच्या मालाची हाताळणी करून घेण्यास प्रतिबंध करण्याबाबत केंद्रीय श्रम मंत्रालयाने ३० ऑगस्ट १९९९ रोजी दिलेल्या निर्देशांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कामगार मंत्री ॲड फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.मंत्री ॲड फुंडकर म्हणाले की, माथाडी कामगार आणि व्यापारी संघटनांमध्ये याबाबत कोणतेही मतभेद नाहीत. कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी टाळण्याबाबत व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. राज्यात माथाडी कामगारांकडून ५० किलोपर्यंतच वजनाची हाताळणी करण्याबाबत परिपत्रक काढले जाणार असून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. तसेच इतर राज्यांमध्येही या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी केंद्र सरकारशी समन्वय साधला जाईल.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या १५ एप्रिल २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ (लासलगाव) यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या, उपबाजार समित्या, व्यापारी संघटना, ट्रान्सपोर्ट व्यवसाय, बियाणे महामंडळ, वखार महामंडळ तसेच इतर संबंधित आस्थापनांना कोणत्याही उद्योग अथवा व्यवसायात ५० किलोपेक्षा अधिक वजनाची चढ-उतार किंवा हाताळणी कामगारांकडून करून घेऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कामगार विभागाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याबाबतही कळविण्यात आले आहे. या निर्देशांच्या प्रभावी अंमलबजावणीची खबरदारी घेण्याच्या सूचनाही मंत्री ॲड फुंडकर यांनी दिल्या.बैठकीस माजी आमदार व माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील दुरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते. कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन, कामगार विभागाचे आयुक्त डॉ एच.पी. तुम्मोड, तसेच संबंधित अधिकारी माथाडी कामगार संघटनांचे प्रतिनिधी आणि व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संकष्टीनिमित्त वरद गणेश मंदिरात विविध फुलांची सजावट



**छत्रपती संभाजीनगर :** समर्थनगर येथील वरद गणेश मंदिरात संकष्ट चतुर्थीनिमित्त विविध फुलांपासून गाभाऱ्यात सजावट करण्यात आली होती. यात ऑर्चिड , डच गुलाब,जरबेरा, जिप्सी अशा 151 फुलांपासून गणरायांभोवती साकारलेली आरास भाविकांचे लक्ष्य वेधून घेत होती.

अधिक मासातील संकष्टीनिमित्त यजमानांकडून अभिषेक,याग करण्यात आला. तसेच रोटरी ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.तसेच मंदिरात सकाळपासून दिवसभर रात्री चंद्रोदयापर्यंत भाविकांची दर्शनासाठी गर्दी झाली होती.

यावेळेसभाविकांना1क्विंटल केळी,51 क्विंटल साबुदाना खिचडी,राजगिरा लाडूचा प्रसाद वाटप करण्यात आला. पंकज खोडेगावकर,गजानन जोशी,पीयूष देशपांडे यांच्या उपस्थितीत वरदविनायकाची दोन्ही वेळेस आरती करण्यात आली. संपूर्ण दिवसभर भाविकांना यथोचित दर्शन व प्रसाद व्यवस्थेसाठी श्री गणेश सभेचे अध्यक्ष सुनील खोचे,सचिव अरविंद तेलवाडकर,कोषाध्यक्ष अनिल वाळूजकर,विश्वस्त मयुरेश कोटणीस,सहसचिव अरूण जोशी,विश्वस्त निर्मला तरटे,उषा देशपांडे,निशा धामणेकर,सेवेकरी मनोहर सराफ,शरद बावसकर,अजय कोटणीस,काळेगावकर,अजय पांडे आदींनी परिश्रम घेतले.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा गळा आवळून खून





कन्नड :दि.०३ जून - तालुक्यातील कळंकी येथील ठाकरवाडी परिसरात चारित्र्याच्या संशयातून पतीने पत्नीचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून कन्नड ग्रामीण पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

मृत महिलेचे नाव कांताबाई दगडू मधे (वय ३३, रा. ठाकरवाडी, कळंकी) असे आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी दगडू मधे याला पत्नीच्या चारित्र्याबाबत संशय होता. याच कारणावरून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक तपासातून अंदाज व्यक्त केला जात आहे.

बुधवारी सकाळी दगडू मधे हा पत्नी कांताबाई व दोन लहान मुलांसह दुचाकीवरून गुजरदरीच्या दिशेने निघाला होता. चिवळी घाटातील जंगल परिसरात पोहोचल्यानंतर कांताबाई यांचा दोरीने गळा आवळण्यात आला. या घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर सोबत असलेल्या दोन लहान मुलांनी घाबरलेल्या अवस्थेत गाव गाठत ग्रामस्थांना या प्रकाराची माहिती दिली पण तोपर्यंत उशीर झाला होता काही नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, मुलांनी "वडिलांसोबत एक दाढीवाला माणूसही होता," असे सांगितले आहे. मात्र, या संदर्भात पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. त्यामुळे तपास पूर्ण होईपर्यंत या बाबत स्पष्ट माहिती समोर येणे बाकी आहे.

दरम्यान, घटनेनंतर आरोपी दगडू मधे हा स्वतः कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाला. विलास कडुबा मेंगाळ यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलिस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण गिते करीत आहेत.

या घटनेमुळे कुटुंबातील चार लहान मुले आईविना पोरकी झाली आहेत. काही दिवसांपूर्वीच कुटुंब धार्मिक कार्यक्रमासाठी एकत्र गेले होते. मात्र, चारित्र्याच्या संशयातून घडलेल्या या घटनेने ठाकरवाडीसह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



छत्रपती संभाजीनगर : जालान नगर भागातील तिरूपती सुप्रीम इन्क्लेव सोसायटी मध्ये श्री आनंद महाराज यांचा भागवत कथा सप्ताह चे आयोजन करण्यात आले आहे.सदर सप्ताहास माजी महापौर नंदकुमार घडोले यांनी भेट दिली असता सप्ताह समितीचे आयोजक संग्राम पठाडे व त्यांच्या सुविद्य पत्नीने त्यांचे नाव व श्रीफळ देऊन सत्कार केला आहे

# इंदिरानगर अनमोल खून प्रकरण : आरोपी अटक करा तोपर्यंत अंत्यसंस्कार नाही



## शिवसेना गटनेता खुनातील आरोपी....


**खून प्रकरणात विकास पांडुरंग पवार, ईश्वर भाऊसाहेब दगडे, साईनाथ विकास पवार सर्व राहणार. इंदिरानगर पैठण तिघांवर कलम १०३ (१) ४९, ५४, ५५, ६० (अ ) भारतीय न्याय सहिंता २०२३ सहकलम तसेच अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी ईश्वर भाऊसाहेब दगडे पैठण नगर परिषद शिवसेना पक्षाचा गटनेता आहे. यात जोपर्यंत दगडे यांना अटक होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नाही. असा भूमिका मृत युवकाच्या नातेवाईकांनी घेतली आहे.**

पैठण दि ०३ :- इंदिरानगर चाकूने छातीवर सपासप वार करून अल्पवयीन युवकाच्या खुनानंतर मृताच्या नातेवाईकांनी पैठण पोलीस स्टेशन व शासकीय रुग्णालय येथे ठिय्या करून खुनातील आरोपी ईश्वर दगडे याला ताब्यात घेत नाही तोपर्यंत मृत युवकाचे अंत्यसंस्कार करणार नाही असा पवित्रा घेतल्याने परिसरात मोठा तणाव निर्माण होत.पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी खुनातील आरोपी दगडे याला पकडण्यासाठी पथके रवाना केल्याची माहिती मिळाली आहे.

पैठण शहरात इंदिरानगर भागात एका अल्पवयीन मुलाचा भर रस्त्यात धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवार दिनांक २ जून २०२६ रोजी सायंकाळी घडली असून, या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

अनमोल देविदास अहिरे (वय १७, रा. इंदिरानगर, पैठण) हा अल्पवयीन मुलगा तहसील रोडवरील बगळा चौक इंदिरानगर येथील राका कॉर्नर परिसरात रात्री आठ वाजता उभा असताना परिसरातील साईनाथ विकास पवार वय १७ याने त्याच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. यात अमोलच्या छातीवर वार केल्याने तो गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी जखमी अनमोलला उपचारासाठी पैठण येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. या घटनेमागील नेमके कारण. अद्याप अस्पष्ट आहे. या प्रकरणी बुधवारी दुपारी पैठण पोलीस ठाण्यात मुलाच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार खुना सह अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम नुसार गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात विकास पवार व साईनाथ पवार या आरोपीना पोलिसांनी अटक केली असून बुधवारी सायंकाळी ४ वाजेपर्यंत खुनातील ईश्वर दगडे या आरोपीला अटक नाही झाल्याने जोपर्यंत आरोपीना अटक होत नाही तो पर्यंत मृत मुलाचे अंत्यसंस्कार करणार नाही असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला आहे.

# घाटीतील ओपीडी सेवेचा अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांचा आढावा



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे बुधवारी सकाळी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी बाह्यरुग्ण विभागाच्या (ओपीडी) सेवेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी विविध विभागांना भेट देत रुग्णांशी संवाद साधला आणि उपचारांबाबत विचारपूस केली.

रुग्णांना वेळेवर व दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी यासाठी आवश्यक सूचना संबंधित विभागप्रमुखांना देण्यात आल्या. विशेषतः अपंग आणि वृद्ध रुग्णांना प्राधान्याने उपचार देण्याचे निर्देश डॉ. सुक्रे यांनी दिले.

घाटी रुग्णालयातील ओपीडी सेवा सकाळी ९ ते दुपारी १ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू असते. या दोन्ही सत्रांमध्ये परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवण्याबाबतही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

'चिठ्ठीमुक्त घाटी' उपक्रमानंतर आता 'कचरामुक्त घाटी'चा संकल्प राबविण्यात येत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. रुग्णालयातील आंतररुग्ण विभाग, बाह्यरुग्ण विभाग तसेच संपूर्ण परिसरात स्वच्छतेची स्थिती समाधानकारक दिसून येत असल्याचे यावेळी अधिष्ठातांनी नमूद केले.

# 8 जूनचा विभागीय 'लोकशाही दिन' थेट रद्द!

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे संपूर्ण विभागात आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर, दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित केला जाणारा 'विभागीय लोकशाही दिन' या वेळी रद्द करण्यात आला आहे.

आगामी ८ जून २०२६ रोजी होणारा हा जनता दरबार आचारसंहितेच्या कचाट्यामुळे स्थगित राहिल, असे अधिकृत परिपत्रक आयुक्त कार्यालयाने जारी केले आहे. निवडणूक आचारसंहितेमुळे संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा निवडणुकीच्या कामात व्यस्त राहणार आहे. त्यामुळे तक्रारी घेऊन येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये आणि कार्यालयात विनाकारण चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. विभागातील सर्व संबंधित नागरिक आणि अर्जदारांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि ८ जून रोजी आयुक्त कार्यालयात गर्दी करू नये, असे आवाहन विभागीय आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आले आहे. निवडणूक संपल्यानंतर पुढील महिन्यापासून हा लोकशाही दिन नेहमीप्रमाणे पुन्हा सुरू होईल.


# गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सावळदबारा येथे अभिवादन



**सावळदबारा प्रतिनिधी :** माजी केंद्रीय मंत्री तथा लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. सावळदबारा येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालयामध्ये अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते,नरेश देशमुख, एकनाथ सपाटे, मुनाफ सय्याद, सखाराम कोते, गणपत चव्हाण, प्रल्हाद नरोटे, भगवान माकोडे, शंकर अवसरमोल, सुधाकर साळुंके,समिर तडवी, उस्मान शेख, आदी होते.

# पोलीस कर्मचाऱ्याचा दृढ निश्चय ; आजपासून करणार फक्त सायकलचाच वापर

## भालेराव यांना केली प्रेरणादायी सुरुवात



**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधून सिटी चौक पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले सायकलप्रेमी रमेश भालेराव यांनी एक प्रेरणादायी संकल्प केला आहे.

ते शक्य तितक्या वेळा सायकलवरूनच कर्तव्य बजावणार आहेत. युद्धाजण्य परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत आणि पर्यावरण संवर्धनासाठी आपले योगदान देत ते हा खारीचा वाटा उचलणार आहेत.

भालेराव हे तेजस्विनी सायकलिंग क्लबचे सक्रिय सदस्य असून सायकलिंगच्या माध्यमातून आरोग्य, पर्यावरण संरक्षण आणि फिटनेसचा संदेश ते समाजापर्यंत पोहोचवत आहेत. त्यांचा हा संकल्प इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे. अधिकाधिक नागरिकांनी सायकलचा वापर करून इंधन बचतीसाठी व पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, हीच अपेक्षा असल्याचे भालेराव म्हणाले.यासह "सायकल चालवा, आरोग्य जपा, इंधन वाचवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा! हा संदेश ते पोहोचविण्यात हातभार लावत आहेत. या संकल्पाबद्दल पोलीस आयुक्त प्रवीण पवार,सिटीचौक पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी,तेजस्विनी सायकलिंग क्लबच्या अध्यक्षा निता गंगावणे आदींनी त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

# श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम येथे अखंड श्रीराम नाम जप व कीर्तन सेवेचे आयोजन भाविक भक्तांनी या सेवेचा लाभ घ्या. आक्का महाराज

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी



खुलताबाद, प्रतिनिधी :दि ३ श्रीक्षेत्र नाथ आश्रम, वेरूळ येथे प.पू. साध्वी सद्गुरू नाथयोगिनी श्री आक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अखंड श्रीराम नाम जप व कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा अधिक ज्येष्ठ शुद्ध ८, शुक्रवार दि. ५ जून २०२६ रोजी प्रारंभ होऊन अधिक ज्येष्ठ शुद्ध १५, शुक्रवार दि. १२ जून २०२६ रोजी सांगता होणार आहे.

या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी आरती, विष्णू सहस्रनाम, हनुमान चालीसा, हरिपाठ, प्रवचन, कीर्तन सेवा, भजन आणि रात्री हरिजागर यांसारखे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विविध भागांतील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व भजन मंडळे या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दि. ५ जून रोजी ह.भ.प. गणेश महाराज नावडे (आळंदी) यांचे कीर्तन होणार असून त्यानंतर ह.भ.प. महेश महाराज गलांडे (वेरूळ), ह.भ.प. गोपाळ महाराज (चिंचोली), ह.भ.प. कृष्णा महाराज चव्हाण (वेरूळ), ह.भ.प. संदीप महाराज पेकळवाडीकर, ह.भ.प. कल्याण महाराज पुंजा (बाजारनगर) आणि ह.भ.प. संतोष महाराज भोसले (गोळेगाव, ता. गंगापूर) यांची कीर्तन सेवा होणार आहे.

सप्ताहाची सांगता शुक्रवार दि. १२ जून रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. अनिल महाराज तुपे (बाभुळगाव, नाशिक) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यास महाराष्ट्रातील विविध भागांतील नाथभक्त, वारकरी, भक्त मंडळ उपस्थित राहून श्रीराम नाम जप, कीर्तन व भजन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु नाथ योगिनी आक्का महाराज व समस्त नाथ भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एआय प्लस स्मार्टफोनची झेप

**पुणे :** एआय प्लस स्मार्टफोनने मे २०२६ मध्ये ३ लाखांहून अधिक स्मार्टफोन युनिट्सची विक्री करत ₹३५० कोटींहून अधिक महसूल नोंदवून महत्त्वपूर्ण व्यावसायिक टप्पा गाठला आहे. या यशामुळे कंपनीची भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्मार्टफोन ब्रँड्सपैकी एक म्हणून ओळख अधिक मजबूत झाली आहे. भारतीय बाजारपेठेत प्रवेश केल्यानंतर अवघ्या एका वर्षाच्या आत एआय प्लसने ग्राहकांचा विश्वास संपादन करत उल्लेखनीय वाढ नोंदवली आहे.

# पोखरीचा चौकार! लिंगायत प्रीमियर लीगचे जेतेपद सोलापूरकडे

## अंतिम लढतीत जालना सी.सी.चा दोन गडी राखून पराभव





हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या लिंगायत प्रीमियर लीग (एलपीएल) २०२६ क्रिकेट स्पर्धेवर पोखरी टीम सोलापूरने आपले नाव कोरले. मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर झालेल्या रंगतदार अंतिम सामन्यात पोखरी संघाने जालना सी.सी.चा दोन गडी राखून पराभव करत विजेतेपदाचा मान पटकावला.

लिंगायत समाजातील क्रिकेटप्रेमींसाठी पर्वणी ठरलेल्या या स्पर्धेत मराठवाड्यासह राज्यातील जवळपास ४० संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेतील प्रत्येक सामना चुरशीचा ठरला असून अंतिम लढतही शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावर्धक झाली. मात्र संयमी फलंदाजी आणि प्रभावी सांघिक खेळाच्या जोरावर पोखरी टीम सोलापूरने विजयश्री खेचून आणली.

समारोप सोहळ्यास माजी खासदार चंद्रकांत खैरे, सचिन खैरे, बसवराज मंगरुळे, गोविंद सोलपुरे, रमेशअप्पा कोठुळे, प्रदीपजी साखरे, लक्ष्मणअप्पा लिंबारे, सुरजभैया कान्होडे, डॉ. मयूर सोनवणे, स्वप्नील हट्टे आणि प्रितेश जैस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या आणि उपविजेत्या संघांचा गौरव करण्यात आला.

स्पर्धेत लिंगायत वॉरियर्स, जनसेवा क्रीडा मंडळ, कोष्टी इलेव्हन, मोयाश सीसी, महाकाल वॉरियर्स, माही फायटर्स तसेच जळगाव आणि लातूर येथील संघांनीही दमदार कामगिरी करत स्पर्धेला वेगळी उंची मिळवून दिली. खेळाडूंच्या उत्कृष्ट खेळामुळे संपूर्ण स्पर्धेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. स्पर्धेदरम्यान सहभागी खेळाडूंच्या निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. मितेश थत्तेकर, कैलास साखरे, उमाकांत शिराळे, स्वप्नील सुपारे, सूर्यकांत वैद्य, उदय लिंबारे, अभिषेक ठेंगे, सोसेअप्पा, अजय लाकडे, शिवानंद मोधे, राजेश कोठळे, शिवाअप्पा खंडकुळे आणि पंचप्रमुख पंकज बेंद्रे यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# पाणी पुरवठा वेळेत करून कामांची गती वाढवा : विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



**छत्रपती संभाजीनगर :** शहराला १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने नवीन पाणीपुरवठा योजनेतील कामांच्या सद्यस्थितीचा आढावा घेत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज नक्षत्रवाडी येथील ३९२ दशलक्ष लिटर क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. तसेच शहराला वेळेत पाणीपुरवठा सुरू होण्यासाठी उर्वरित आवश्यक कामे जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधितांना दिले.

छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, अपर आयुक्त (विकास व नियोजन) सुषमा देसाई, सहआयुक्त देविदास टेकाळे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर शहराला नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि सबंधित कंपनीला दिले आहेत. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी पाणीपुरवठा योजनेच्या कामाची वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करून पावसाळ्यापूर्वीची कामे पूर्ण करण्याबाबत विविध सूचना संबंधितांना दिल्या.

नक्षत्रवाडी जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पाणी प्रक्रिया केंद्र, एरिएशन, क्लोरिनेशन व फिल्ट्रेशन प्रकल्पांची पाहणी यावेळी करण्यात आली. शहरातील पाणीपुरवठा योजनेची उर्वरित कामे संबंधित कंत्राटदार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महानगरपालिका यांनी समन्वयाने व तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911